# संतप्त आम्ही

मिलिन्द रानडे
www.marathimanoos.com

आम्ही फार संतापलो आहोत
खरोख्खर सांगतो,
आम्ही फारच संतापलो आहोत
बस्स झालं हे सगळं आता. . .
आम्ही फार संतापलो आहोत आता
'काय झालं' म्हणून विचारता?
अहो असं काय करता?
तुम्ही जागे आहात की नाही
न्यूज चॅनल्सनी २४/७ चालवलेला गजर
तुमच्यापर्यंत आलेला दिसत नाही
अहो आभाळ कोसळलंय आभाळ भारतावर
अतिरेक्यांनी केलाय कब्जा आमच्या लाडक्या
फाईव्ह स्टार हॉटेलावर!

हे काही आमच्यानं सहन होणार नाही
अगदी नाही म्हणजे नाही.

आता हेच बघा ना,
बांगलादेश सीमेवर त्यांनी ठार मारलं
आमच्या जवानांना हाल करून
तेव्हा आम्ही मनातल्या मनात चरफडत बसलो.
काश्मीर मधून त्यांनी हुसकावून लावलं आम्हाला
आम्ही गुपचुप चालते झालो.

आमच्या देशातच आम्ही निर्वासितांसारखे राहतो
कुठ्ठे कुठ्ठे तक्रार करत नाही,
आम्ही आमच्याच नशिबाला दोष देतो.

पण आमच्या फाईव्ह स्टार वर हल्ला?
हे मात्र आम्ही सहन करणार नाही
आम्ही भयंकर संतापलोय आता. . .
पण याचा अर्थ तुम्ही असा घेऊ नका हं,
की आम्ही युद्ध पुकारू
त्याचं काय आहे माहीताय का,
युद्धाचा विचार की नाही
स्वतंत्र स्वाभिमानी राष्ट्र करतं
आमच्या सारख्या 'तृतीय पंथीय' राष्ट्रांना
' प्रॅक्टिकल' राहावं लागतं
शस्त्रांचा विषय काढताय,
. . . आम्ही त्याबद्दल काय बोलणार?
अहो असू द्यात आमच्यापाशी मोठाली शस्त्रं,
त्यांनी काय होणार?
आणि ती शस्त्रं जर युद्धात वापरली,
तर २६ जानेवारीला दिल्लीच्या परेडमध्ये
काय घंटा ठेवणार?
देशोदेशीचे पंडित आम्हालाच
गांधीजींची आठवण करून देणार!
विद्यापीठांमधले डावे विद्वान
आम्हालाच सडलेल्या सेक्युलॅरिझमचा
बुळबुळीत एनिमा देणार!
छे छे, नकोच तो महागडा स्वाभिमान
अहो, त्याची किंमत मोजायला लागते

आपली अहिंसाच बरी
ती फुकटात पडते
फुटपाथवर मिळते!

पण तुम्ही असं समजू नका हं, की आम्ही खवळलेलो नाही
आम्ही खवळलो की काय करू तुम्हाला ठाऊक नाही
(  आम्हालाही नाही!. . . कदाचित काहीच नाही! )
आमच्या ताकदीची तुम्हाला कल्पना नाही
मुख्यमंत्री की चपराशी आम्ही पाहात नाही
चिडल्यावर आम्ही जमीन आस्मान हलवून टाकतो
विलासला खलास आणि आरआर ला तडीपार करून टाकतो!
( आता काही खवचट म्हणतील,
ढवळया जातो आणि पवळया येतो
सावळा गोंधळ तसाच राहतो! )

आता बघा ना, संतापल्यावर आम्ही आमच्या सर्व शासकीय,
गुप्तचर, सैन्य यंत्रणा अहोरात्र कामाला लावल्या
आणि तयार केली. . . .
एक यादी !
तुम्हाला सांगतो, अशी जबरदस्त यादी होती ना ती,
काही विचारूच नका!
आणि देऊन टाकली ती त्या
सीमेपलिकडच्या अमुक तमुक देशाला!
बघा बुवा, काही येतंय का करता, प्लीज. . . जमलं तर,
आपलं सहज झालं तर, तसा आग्रह काही नाही. . .

पण आमचा संताप,
तो काही कमी झालेला नाही.

त्यांनी मंदिरांवर हल्ले केले, आम्ही बोललो नाही!
लोकल मध्ये फोडले बाँब, आम्ही म्हणालो, चालायचंच!
लोकसभेवर हल्ला केला, वाटलं आम्हाला थोडंसं वाईट
पण आमचे अनेक खासदार तर नामचीन बदमाष आहेत
'ते का नाही मेले', असं म्हणाले आमचेच काही लोक वात्रट!

. . . आणि आता त्यांनी कळसच केलाय
आमच्या फाईव्ह स्टारवर हल्ला केलाय
अरे फाईव्ह स्टारवर हल्ला
म्हणजे हल्ला आमच्या सर्वस्वावर
दिल्ली मुंबईतून नाही, फाईव्ह स्टारातून चालतो
आमच्या देशाचा कारभार
इथे येतं सगळं जग, आम्हाला बघायला,
आणि विकत घ्यायला कचऱ्याच्या भावात
कॉन्व्हेंटात शिकलेले आमचे महान इंटेलेक्च्युअल्स
इथे कॉफी प्यायला जमतात
इथे भरतात मेळावे आमच्या सत्तेच्या दलालांचे
विजयोत्सव साजरे होतात इथे आम्हाला लुटणाऱ्यांचे
अशा आमच्या मर्मावर हल्ला?
हे मुळीच खपणार नाही आम्हाला
काही अंतच नाही आता आमच्या रागाला. . .

पण आम्हाला माथेफिरू समजू नका हं
आम्ही तसे समजुतदार आहोत
माणसंच आहेत. . . मरणारच, आम्हाला ठाऊक आहे.
आता हेच पहा ना, आमचे हजारो शेतकरी मरतायत
आत्महत्या करून
आम्ही काही म्हणालो कां?

आजीबात नाही!
मुंबईत मोर्चे निघाले कां?
आजीबात नाही!
देश विदेशात झाल्या कां श्रद्धांजल्यांच्या सभा?
अंहं !
आम्हालाही म्हटलं थोडीफार अक्कल आहे
मेले तर मेले हजारो भिकारडे शेतकरी,
पण आम्हाला माहिती आहे
की खरंतर सर्व काही आलबेल आहे.
आमच्या कृषिमंत्र्यांचं स्थान अढळ आहे !
सगळी सारवासारव करायला एक अर्थतज्ज्ञही पाळलेला आहे
कृपा झाली सोनियाची, तर पंतप्रधान होण्याचाही चान्स आहे
एन्रॉनची एनर्जी बंद पडली तरी मॉन्सॅन्टोचा मलिदा चालू आहे !
अहो, या ग्लोबलायझेशनच्या जगात
सैनिक आणि शेतकऱ्याच्या जिवापेक्षा
फाईव्ह स्टार कॉर्पोरेट एक्झिक्युटीव्हचा प्राण मोठा आहे !

पण आता आम्ही संतापलोय
आणि घेतलाय धडा
जो आम्ही नेहमीच घेत असतो
धडा हाच, की काहीच धडा
आम्हाला घ्यायचा नसतो
माणसं पेटून उठलीत देशप्रेमाने
पण आम्ही त्याचं काहीच करणार नाही
न प्रशासन सुधारणार, न संपवणार भ्रष्टाचार
विदेशी घुसखोरांना रेशनकार्डे
अशीच घरपोच मिळत राहणार

पण असं समजू नका हं,
की आम्हाला त्याचा राग नाही
आमच्या रागाला काही पारावरच नाही
आम्ही आता भविष्यच बदलून टाकणार आहोत
अरे भविष्यच काय,
भूतकाळही बदलण्याची धमक आहे आमच्यात
मग? समजता काय आम्हाला?
नुकताच नाही कां आम्ही
लोकशाहीचा योग्य उपयोग केला?
नेमली समिती
आणि शिवाजीचा गुरू बदलून टाकला!

आता आम्ही केलाय ठाम निर्धार
नाही आम्ही  रोज रोज
त्यांचे पाय चाटणार
आता आम्ही संतप्त आहोत
आणि आमचा संताप
असाच राहाणार आहे
खरं सांगू?
असं नुस्तं संतप्त राहाण्यातली
मजाच काही और आहे
असं नुस्तं संतप्त राहाण्यातली
मजाच काही और आहे. . .